|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)

## वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालय

जा.क्र. कबचौउमवि/08/61/2022 दिनांक 30.01.2023

# परिपत्रक

**कबचौउमविशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांचे**
**मा. प्राचार्य तसेच**
**संस्थांचे मा.संचालक .....**

**विषय :- अग्रीम रक्कम समायोजनाबाबत (Settlement of Advances)......**

**महोदय/महोदया,**

वित्त विभागामार्फत संलग्नीत महाविद्यालये/ संस्थांना, विद्यापीठामार्फत राबविण्यात येणा-या विविध प्रयोजनांकरिता संबंधित विभागांच्या शिफारशीने मा.कुलगुरु महोदयांच्या मान्यतेनुसार अग्रीम देण्यात येतो. सदर अग्रीम हा वार्षिक, एखादी विशिष्ट घटना/ कार्यक्रमासाठी देण्यात येत असतो व तद्नंतर त्याचे देयक सादर करुन समायोजन करावयाचे असते.

त्याचप्रमाणे वार्षिक अग्रीमाव्यतिरिक्त, एखादी विशिष्ट घटना/ कार्यक्रमासाठी अग्रीम देण्यात आला असल्यास, अशा अग्रीमाची देयकेदेखील विहीत कालमर्यादेत समायोजित होणे आवश्यक तथा क्रमप्राप्त आहे. तसेच एखाद्या विशिष्ट घटना/ कार्यक्रमासाठी अग्रीम देण्यात आला आहे, परंतु ती घटना/ कार्यक्रमच झाला नसल्यास, सदर प्रयोजनासाठी घेतलेला अग्रीम विहीत मुदतीत विद्यापीठात जमा करणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, **कमवा-शिका योजना (Earn & Learn Scheme), VCRMS, NSS परीक्षा** व अन्य प्रयोजनासंदर्भात जी अग्रीम रक्कम घेण्यात आली आहे व त्याचे कामकाज पूर्ण झालेले आहे, अशा बाबींच्या अग्रीम समायोजनासाठी आवश्यक ते कागदपत्र/दस्तऐवज सनदी लेखापाल यांच्या उपयोगिता प्रमाणपत्रासह (Utilization Certificate) ***दिनांक 10 फेब्रुवारी, 2023 च्या आंत*** विद्यापीठाच्या वित्त विभागात जमा करावेत. त्याचप्रमाणे ज्या प्रयोजनासाठी अग्रीम घेण्यात आला आहे व ते प्रयोजन पूर्ण झाले आहे, अशा बाबींची देयके, कागदपत्र/दस्तऐवज व संबंधित माहिती सदर बाब पूर्ण झाल्याच्या दिनांकापासून 15 दिवसांच्या आंत समायोजनासाठी सादर करावीत. अग्रीम समायोजित करणेबाबत ***दिनांक 10 फेब्रुवारी, 2023 पर्यंत*** तसेच संबंधित प्रयोजन पूर्ण झाल्याच्या दिनांकापासून 15 दिवसांच्या आंत माहिती व कागदपत्र/ दस्तऐवज प्राप्त न झाल्यास, त्यावर नियमानुसार व्याजाची आकारणी करणेबाबत तरतूद असून, आवश्यकता भासल्यास, प्राप्त आदेशान्वये, त्यावर शास्तीचीदेखील कार्यवाही करण्यात येईल. तरी सदर बाब लक्षात घेता, कृपया संबंधित अग्रीम समायोजनाची **विहीत मुदतीत कार्यवाही करण्यात यावी**, ही विनंती.

आपला स्नेहांकीत,

**(सीए रविंद्र ना. पाटील)**
वित्त व लेखा अधिकारी

प्रत माहिती तथा कार्यवाहीस्तव:-
नियंत्रक अधिकारी आणि संबंधित कर्मचारी (बिल पासिंग युनिट), (अग्रीम युनिट), कॅश काऊंटर, वित्त विभाग, कबचौउमवि, जळगाव.